तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मिळालेले रु.९६१.०० कोटी प्रोत्साहनात्मक सहायक अनुदान

मागणी क्र.के-६,मुख्य लेखाशीर्ष अंतर्गत नवीन लेखाशीर्ष उघडण्याबाबत

महाराष्ट्र शासन

उद्योग, उर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांकः निधिवि-२०१३/प्र.क्र.१७६-ब/ऊर्जा-७

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.

तारीख: १६ जानेवारी, २०१६.

प्रस्तावना:-

केंद्र शासनाने दिनांक १६.३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यास रु.९६१.०३ कोटी अपारंपरिक ऊर्जेकरीता प्रोत्साहनात्मक अनुदान घोषित केले आहे. तसेच, त्यांच्या दिनांक ३१.३.२०१५ च्या पत्रान्वये या निधीचे वितरण कोणत्या कामासाठी करावे याबाबत मार्गदर्शक तत्त्वे कळविलेली आहेत. वित्तीय वर्ष २०१५-१६ करीता प्राप्त सदर रु.९६१.०३ कोटी इतका निधी केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याकडे हस्तांतरीत केला असून तो राज्याच्या एकत्रित निधीमध्ये वर्ग करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला सदर रु.९६१.०३ कोटींचा निधी व उपरोल्लेखित प्रयोजनाकरीता यापुढे केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त होणारा सदर निधी महाराष्ट्र ऊर्जा विकास अधिकरण, पुणे यांना वितरीत करण्याकरीता नवीन लेखाशीर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यास प्राप्त झालेला रु.९६१.०३ कोटींचा अपारंपरिक ऊर्जेकरीता प्रोत्साहनात्मक अनुदानाचा निधी तसेच या प्रयोजनाकरीता वेळोवेळी केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त होणारा निधी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना वितरीत करण्यासाठी नवीन लेखाशीर्ष (आठ अंकी संगणक संकेतांकासह) उघडण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	मराठी	इंग्रजी
१	मागणी क्र. के-०६ २८१०-अपारंपरिक ऊर्जा साधने ००-अपारंपरिक ऊर्जा साधने १०५-सहायक कार्यक्रम ०१-अपारंपरिक ऊर्जा अंतर्गत पारेषण केंद्रीत प्रकल्प आस्थापित करणे (केंद्र पुरस्कृत योजना) (०१)(०१) १३व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार मिळालेले प्रोत्साहनात्मक अनुदान (केंद्र शासनाचा हिस्सा १००%) (२८१० ०९११)	Grand No. K-06 2810-Non Conventional Sources of Energy 00-Non Conventional sources of Energy 105-Supporting Program 01-To install Energy Grid program under Renewable Energy (Centrally Sponsored Scheme) (01)(01) Incentive Grants as per recommendations of 13th Finance Commission (Central share 100%) (2810 0911)

हा शासन निर्णय महालेखापाल कार्यालयाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ख.वि./चा-१/उद्योग, ऊर्जा तथा कामगार विभाग/युओआर-७८/२०१५-१६/६७०, दिनांक २४.८.२०१५, नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २९४/१४६१, दिनांक ३१.८.२०१५ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ६३/अर्थ-१४, दिनांक ४.१२.२०१५ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११६१२०२२७२३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini P Jadhav

Digitally signed by Rohini P Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOURS DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=12646d8130730515a2533ddd2b46b2c82ca9b32dbbcd3d60f21e82f7cc2ee090, cn=Rohini P Jadhav
Date: 2016.01.16 12:04:09 +05'30'

रो.प्र.जाधव
अवर सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मंत्री/ सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. सर्व विधानमंडळ सदस्य, विधान भवन,मुंबई,
५. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई,
७. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई,
८. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई,
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालयीन विभाग.
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
१३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
१४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई,
१५. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,मुंबई (पत्राने),
१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सूत्रधार कंपनी मर्या., मुंबई,
१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई,
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., मुंबई,

१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई,

२०. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे,

२१. उप सचिव/ऊर्जा-३, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई,

२२. ऊर्जा उप विभागातील सर्व कार्यासने, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई,

२३. निवड नस्ती,ऊर्जा-७, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.